पुणे शहर विशेष

# डोळ्यांच्या जंतूसंसर्गावरील कार्यशाळेची सांगता

प्रतिनिधी

सोमवार

पुणे : डोळ्याच्या आतील भागांत होणारा जंतूसंसर्ग (एन्डॉफ्थाल्मायटिस) या विषयावर गडकरी आय सेंटरतर्फे अरोरा टॉवर्स येथे एक दिवसाची कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. पूना आफ्थाल्मॉलॉजिकल सोसायटी (पी.ओ.एस.) चा ह्यात सहभाग होता. राज्यभरातून १५० नेत्रतज्ज्ञ ह्या कार्यशाळेत भाग घेण्यासाठी आले होते.

नेत्रपटल रोग विशेषज्ज्ञ डॉ. सलिल गडकरी यांनी या जंतूसंसर्गाच्या अद्ययावत इलाजाचा आढावा घेतला. एल. व्ही. प्रसाद आय इन्स्टिट्यूट (हैदराबाद) चे डॉ. ताराप्रसाद दास यांनी उपस्थित डॉक्टरांच्या प्रश्नांची उत्तरे, थेट हैदराबादहून दिली. मुंबई व पुण्यातील प्रस्थापित नेत्रतज्ज्ञांनी ह्या कार्यशाळेत आपले विचार मांडले.

पी.ओ.एस. चे अध्यक्ष व जिल्हा नेत्रशल्य चिकित्सक डॉ. श्रीकांत रानडे म्हणाले की, अशा कार्यशाळा भरविल्याने प्रचलित इलाज पद्धती सुधारतात व प्रगत होतात. डॉ. मोहन जोशी व डॉ. प्रकाश मराठे यांनी उपस्थितांचे स्वागत केले.

India Media Monitor